

JEFATURA ZONAL LEONCIO PRADO - PADRE ABAD

CERTIFICA:

MINISTERIO DE LA PRESIDENCIA - INADE

मूळ दस्तऐवज स्पॅनिश भाषेत असून त्याच्या इंग्रजी भाषांतराचे
हे मराठी भाषांतर –

मूळ दस्तऐवजावर मिनिस्ट्री ऑफ द प्रेसिडेन्सी –
इनादे, रिपब्लिक ऑफ पेरू यांची सही आणि शिक्का आहे.

नॅशनल इन्स्टिटय़ूट ऑफ डेव्हलपमेंट स्पेशल प्रॉजेक्ट अल्तो ग्वायागा

लिओन्सिओ प्रादो – पाद्रे आबाद

# सर्टिफिकेट देतात –

अल्तो ग्वायागा विभागात सुमारे 7 महिन्यापासून होमा थेरेपी या नावाचे ऑरगॅनिक व एकॉलॉजिकल तंत्रज्ञान या क्षेत्रातील अन्नधान्याचे पीक पुनश्च टवटवीत आणि चैतन्य पूर्ण करण्यासाठी उपयोगात आणले गेले. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतपीकावरील विविध प्रकारच्या रोगजंतूंचे प्रमाण खूपच कमी झाले. या होमा थेरपीचा परिणाम म्हणून विविध पिकांवरील अनेक प्रकारच्या रोगांचे आणि संसर्गजन्य जंतूंचे समूळ उच्चाटन झाले, पीकांचे उत्पादन भरपूर वाढले, फळे निरोगी आणि पौष्टिक येऊ लागली, त्यांचा रंग, स्वाद, वजन, पोत इ. मध्ये सुधारणा झाली. वनस्पतींच्या आरोग्याबाबत अनेक वर्षापासून निर्माण झालेल्या चिंताजनक परिस्थितींशी सामना करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले. या आधी कल्चरल कंट्रोल, केमीकल कंट्रोल, बायोलॉजिकल कंट्रोल व लीगल कंट्रोल या सर्व पद्धतीनी प्रयत्न करूनसुद्धा रोग नियंत्रणात आणण्यास आम्हास काहीही यश मिळाले नाही.

आजपर्यंत आम्ही अल्तो ग्वायागा विभातात 40 हेक्टर क्षेत्राचा एक शेती विभाग असे एकूण 30 शेती विभाग पाडले आहेत. या सर्व क्षेत्रात होमा थेरपी शेती तंत्र राबविण्यात आले. एकूण सर्व मिळून 1200 हेक्टर क्षेत्र आहे. या सर्व क्षेत्रात कायम स्वरूपी एकात्मिक पीक पद्धती लागू केली असून तेथे केळी, पपई, कोको, लिंबूवर्गीय फळझाडे, ॲव्होकाडो, कॉफी, चहा, स्टार फ्रुट, आंबा यासारखी कायम स्वरूपी झाडांची लागवड केली आहे. या लागवडी बरोबरच भात, मका, सोयाबीन, तीळ इ. अल्प मुदतीची वार्षिक पिके घेतली जातात. मधुमक्षिका पालन आणि गोपालन येथे केले जाते.

श्रीमती ग्लोरिया गुझमान मेण्डेझ, यांनी होमा सेंद्रिय कृषी तज्ञ आणि प्रमुख या नात्याने आमच्या विभागात काम पार पाडल्याबद्दल आम्ही त्यांना संपूर्ण सहयोग देत आहोत. तसेच होमा सेंद्रिय कृषीचा अंगीकार केलेल्या किसान बांधवांनाही आम्ही सहयोग देत आहोत. शेती सुधार, मृदा संधारण, वन संवर्धन आणि पर्यावरणाचे संतूलन हे सर्व अल्तो ग्वायागा येथे होमा सेंद्रिय कृषीमुळे साध्य होऊ शकले.

टिंगो मारिया 17 मे 1999

मिनिस्ट्री ऑफ द प्रसिडेन्सी – इनादे स्पेशल प्रॉजेक्ट अल्तो ग्वायागा

स्ही

इंजिनियर होसे ए. मुन्योझ कार्डेनास

चीफ, सपोर्ट ऑफिस, लिओन्सिओ प्रादो–पाद्रे आबाद